
तरुण भारत
शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# 'युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे'

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जगप्रसिध्द शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी सन २१०० मध्ये पृथ्वी मानवी वस्तीयोग्य राहणार नाही. तेव्हा मानवाने दुसऱ्या मानवी वस्तीयोग्य ग्रहाचा शोध घ्यावा असे भाकित केले आहे. त्याची प्रचिती आपल्याला पावलोपावली येत आहे. त्यामुळे युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.




**कोल्हापूर : विवेकानंदमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. मधुकर बाचुळकर. सोबत डॉ. एच. पी. पाटील, प्रा. व्ही. एम. पाटील.**

डॉ. बाचुकर म्हणाले, वसुंधरेच्या रक्षणासाठी आपल्याकडे थोडांच अवधी राहिला आहे. जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात जैवविविधतेचा ऱ्हास होताना उघडया डोळयांनी पाहत आहे. स्वागत व प्रास्ताविक डॉ. एच. पी. पाटील यांनी केले. परिचर प्रा. व्ही. एम. पाटील यांनी करुन दिला. सुत्रसंचालन डॉ. निशा सुर्वे यांनी केले. आभार डॉ. जी. एस. उबाळे यांनी मानले. यावेळी आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदच्या ४० विद्यार्थ्यांची मोफत प्रशिक्षणासाठी निवड

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाविद्यालयाच्या इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्हतर्फे बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी. सी. एस. व बी. सी. ए. च्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती क्सुय स्पायडर्स कंपनीने घेतल्या. मुलाखतीमधून ४० विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या मोफत प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली.

या सर्व विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लट्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# सुक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे मायक्रोटून, एक्सटेम्पर स्पर्धा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील सुक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय सुक्ष्मजीव दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी मायक्रोटून व एक्सटेम्पर स्पर्धेचे आयोजन केले होते. डॉ. एस. बी. मुल्ला यांच्या हस्ते उदघाटन झाले. प्रा. व्ही. एन. मोरे, डॉ. एस. बी. मुल्ला यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धा संयोजनासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.